| | | |
|---|---|---|
| MHYA170002702010 | खटला दाखल तारीख | ०८/०३/२०१० |
| | पंजीकृत तारीख | ०८/०३/२०१० |
| | निकालाची तारीख | १८/०३/२०२६ |
| | कालावधी १६ वर्षे, ०० महिने, १० दिवस | |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळंब यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : ह.ना.पोले यांचे समक्ष)**
**न्यायनिर्णय घोषित दिनांक १८ मार्च, २०२६**
**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०३/२०१०)**

| | |
|---|---|
| | गुन्हा रजिष्टर क्र.०४/२०१०,<br>पोलीस ठाणे– कळंब, ता. कळंब, जि. यवतमाळ. |
| फिर्यादी/तक्रारदार | महाराष्ट्र शासन,<br>कळंब पोलीस ठाणे,<br>ता.कळंब, जि. यवतमाळ. |
| अभियोगपक्षामार्फत | सहा.सरकारी अभियोक्ता–श्री. आर.आर.त्रिवेदी. |
| आरोपी | कन्हैया कवडुजी गोंदुळे,<br>वय ३८ वर्षे, व्यवसाय– चालक,<br>रा.कापसी खुर्द, जि.नागपूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री व्ही.ए.चौधरी |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ११/०१/२०१० |
| फिर्याद दाखल दिनांक | ११/०१/२०१० |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | ०८/०३/२०१० |
| दोषारोप निश्चीत दिनांक | २०/०७/२०१२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | १८/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १८/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| | |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | – |

**आरोपीची माहीती.**

| अ.क्रं | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीना वर सोडल्याची तारीख | दोषारोपातील कलम | निर्दोष किंवा दोषी | देण्यात आलेली शिक्षा | खटल्या दरम्यान आरोपीने भोगलेल्या कारावासाचा कालावधी कलम ४२८ फौ.प्र.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कन्हैया कवडुजी गोंदुळे | कलम ४१(अ) नुसार सुचनापत्रावर सोडले. | १२/०१/२०१० | २७९, ३३७, ३०४–अ भा.द.वि. | निर्दोष | – | – |

**भाग 'क'**

**(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)**

**अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार.**

अ. अभियोगपक्ष–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अभि. सा.क्र.०१ | विलास देवराव काकडे | पंच साक्षीदार |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| आरोपी.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| न्याया.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाने/ आरोपीने/ न्यायालयाने सिध्द झालेली/निशाणी पडलेली कागदपत्रे**

अ. अभियोग पक्ष–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| ०१. | निरंक | निरंक |

ब. बचावपक्ष–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

ड. मुद्देमाल–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य
## (अधिघोषित दिनांक १८/०३/२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३०४–अ अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची हकीकत खालीलप्रमाणे आहे :–**

**०२.** फिर्यादी इकबाल बेग शफी बेग यांनी दिनांक ११/०१/२०१० रोजी पो.स्टे.कळंब येथे फिर्याद दिली की, दिनांक ११/०१/२०१० रोजी दुपारी १२.३० वाजताचे दरम्यान आरोपीने ट्रक क्र.एमएच४०/५२०१ हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून विरुध्द दिशेने जावुन यवतमाळ ते नागपूर कडे

जाणाऱ्या मोटरसायकल बजाज पल्सर क्र.एमएच२९/एच–१९४० ला जोरदार धडक दिली. त्यामुळे मोटरसायकलवर डबलसिट जात असलेल्या अकील हुसेन अन्सार हुसेन सिद्दीकी हा घटनास्थळी मरण पावला व त्याचा मित्र गफार शहा सत्तार शहा हा गंभीर जखमी झाला. तो उपचारादरम्यान मरण पावला असुन चालक हा अपघात घडवुन पळुन गेला. त्यामुळे त्यांनी आरोपीविरुद्ध सदर फिर्याद दाखल केली.

**०३.** सदरील फिर्याद वरुन पोलीस ठाणे, कळंब, जि. यवतमाळ येथे गु.र.क्र. ०४/२०१०, भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३०४–अ भा.दं.वी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०४.** आरोपीविरुध्द भारतीय दंड संहीतेच्या कलम २७९, ३३७, ३०४–अ वर दोषारोप (नि.क्र.०६) निश्चित करण्यात आले. आरोपीने त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप नाकारले आणि संपरिक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीचे दोषारोप तयार केल्यानंतर आरोपी वारंवार प्रकरणात गैरहजर राहीला. त्यामुळे त्याचेविरुध्द गैरजमानती वारंट वेळोवेळी पाठवण्यात आले. परंतु आरोपीचे हजेरी न्यायालयासमोर शक्य होवु शकली नाही. त्यामुळे शेवटी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अंतर्गत नमुद कार्यप्रणाली वापरुन साक्षीदारांना समन्स पाठवण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाचे खटल्याचे कथन विचारात घेता, खालील मुद्दे माझे विचारार्थ आले. त्यावर मी खालीलप्रमाणे कारण–मिमांसेनुसार निष्कर्ष नोंदविले आहोत.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| १) दिनांक ११/०१/२०१० रोजी दुपारी ०१२.३० वाजता दरम्यान कळंब यवतमाळ रोडवर घोटी शिवाराजवळ आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवितास धोका निर्माण होईल | ...नकारार्थी. |

आणि एखाद्या व्यक्तीस दुखापत, अगर नुकसान पोहचवण्याचा संभव होईल अशा प्रकारे त्यांच्या ताब्यातील ट्रक क्र.एमएच४०/५२०१ हा भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून भा.द.वि.चे कलम २७९ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ?

२) वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवितास धोका निर्माण होईल आणि एखादया व्यक्तीस दुखापत, अगर नुकसान पोहचवण्याचा संभव होईल अशा प्रकारे त्यांच्या ताब्यातील ट्रक क्र.एमएच४०/५२०१ हा भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून विरुध्द दिशेने जावुन यवतमाळ ते नागपूर कडे जाणाऱ्या मोटरसायकल बजाज पल्सर क्र.एमएच२९/एच–१९४० ला जोरदार धडक दिली व त्यात अकील हुसेन अन्सार हुसेन सिद्दीकी व गफार शहा सत्तार शहा यांना साधी दुखापत घडवून आणली व त्यायोगे भा.द.वि.चे कलम ३३७ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ? ...नकारार्थी.

३) वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने मानवी जीवितास धोका निर्माण होईल आणि एखादया व्यक्तीस दुखापत,अगर नुकसान पोहचवण्याचा संभव होईल अशा प्रकारे त्यांच्या ताब्यातील ट्रक क्र.एमएच४०/५२०१ हा भरधाव व निष्काळजीपणाने चालवून अपघात होण्यास कारणीभूत ठरुन अकील हुसेन अन्सार हुसेन सिद्दीकी व गफार शहा सत्तार शहा यांचे मृत्युस कारणीभुत होवून भा.द.वि.चे कलम ३०४(अ) अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ? ...नकारार्थी.

४) आदेश काय ? ...आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

## <u>कारणमिमांसा</u>

०६. अभियोगपक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता घटनेच्या दिवशी आरोपीने ट्रक क्र.एमएच४०/५२०१ चालवून मोटरसायकल

बजाज पल्सर क्र.एमएच२९/एच–१९४० ला जोरदार धडक दिली व त्यात अकील हुसेन अन्सार हुसेन सिद्दीकी व गफार शहा सत्तार शहा यांचे मरणास कारणीभूत झालात, ही बाब संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

**<u>मुद्दा क्र.०१ ते ०३ करीता</u> :–**

**०७.** मुद्दा क्र.०१ ते ०३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने व त्याबाबतचा पुरावा एकसारखा असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरीता व सोयीकरीता त्यांची कारणमिमांसा एकत्रीत नोंदवण्यात येत आहे.

**०८.** अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार तथा सा.क्र.०१ नामे विलास यांची साक्ष नोंदण्यात आली आहे. त्यामध्ये त्यांनी कथन केले की, दिनांक ११/०२/२०१० रोजी पंचनामाकामी बोलवले नव्हते. अभियोगपक्षातर्फे त्यांचे उलटतपासाच्या स्वरुपातील प्रश्न विचारण्यात आले. परंतु अभियोगपक्षाला मदत होईल अशा कोणत्याही बाबी पटलावर आलेल्या नाही. इतर साक्षीदारांना सुध्दा समन्स पाठवण्यात आले. इतर साक्षीदारांपैकी साक्षीदार किशोर वाघ हे साक्ष देण्यास प्रकृती अस्वास्थ्यामुळे सक्षम नसल्याचा तसेच फिर्यादी व इतर साक्षीदार हे दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याचा अहवाल न्यायालयास प्राप्त झाला. हे सर्व अहवाल निशाणी क्र.०८, ०९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८ अन्वये पटलावर दाखल करण्यात आलेले आहे. अभियोगपक्षातर्फे जास्तीत जास्त साक्षीदारांना हजर करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन आल्यामुळे निशाणी क्र.०१ वरील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाची बाजु बंद करण्यात आली.

**०९.** सदर अपघातातील वाहनाचा चालक आरोपीच होता व त्याच्या हयगयी व निष्काळजीपणामुळे अपघात झाला याबाबत कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही. त्यामुळे सदर अपघात हा आरोपीच्या चूकीमुळे झाला हे संशयापलीकडे सिद्ध झालेले नाही. सबब, मुद्दा क्र.०१ ते ०३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.०४ करिता</u> –**

**१०.** भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३०४–अ अन्वये दोषारोप आरोपीविरुध्द संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष म्हणून मुक्त करण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ०४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>–: आ दे श :–</u>**

१. आरोपीला भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३०४–अ अन्वये प्रमाणे गुन्ह्याच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीच्या विरोधातील वॉरंट रद्द करण्यात येते.

४. आरोपीचे वॉरंट रद्द केल्याबाबत पोलीस स्टेशन कळंब यांना पत्राद्वारे कळवावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

**Sd/–**
**(ह.ना.पोले),**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
कळंब. जि.यवतमाळ

दिनांक : १८/०३/२०२६
ठिकाण : कळंब.